# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/ ९६ /२०१६

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक No.Exam/Sc/873 of 2016 दि. २२ मार्च, २०१६ अन्वये M.K.C.L. या अभिकरणामार्फत Online परीक्षाप्रवेश अर्ज स्विकारण्यात आलेल्या शिक्षणक्रमाचा विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयाने घेतलेल्या अंतर्गत परीक्षांचे गुण Online पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

याबाबत असे निर्दशनास येते की, अद्यापही बऱ्याचश्यः महाविद्यालयांकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षांचे गुण अद्याप Online पाठविण्यात आलेले नाही.

तरी याबाबत पुनःश्च असे कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पाठविले नसतील अशा महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण Online पद्धतीने दि. १८ मे, २०१६ पर्यंत पाठवावेत व त्याचे Hard Copy विद्यापीठाकडे जमा करावी.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या शिक्षणक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने स्विकारण्यात आलेले आहेत या शिक्षणक्रमासाठीचे विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही काही महाविद्यालयांकडून प्राप्त नाहीत. तरी ज्या महाविद्यालयाकडून या शिक्षणक्रमाचे अंतर्गत परीक्षेचे गुण अद्यापही विद्यापीठात सादर केलेले नाही त्यांनी ते दि. १८ मे, २०१६ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावेत.

ज्या महाविद्यालयाकडून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंर्तगत परीक्षेचे गुण उपरोक्त नमुद दिनांकापर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात प्राप्त न झाल्यास त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व यांस संबंधीत महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. १३ मे, २०१६.

प्रति :—
संचालक/प्रमुख, विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग
प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालये
प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाचे दुर व मुक्त अध्ययन संस्था
संचालक मान्यताप्राप्त संस्था
समन्वय, रत्नागिरी उपकेंद्र
मानद सल्लागार ठाणे उपकेंद्र

अ. प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

संचालक,संगणकीय सुविधा केंद्र, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ.

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—

१. समन्वयक, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव परीक्षा विभाग
३. सर्व सहाकुलसचिव परीक्षा विभाग

क. प्रत माहितीस्तव अग्रेषित :—

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.